# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222**


जावक क्रमांक : यचममुवि / आरक्षण कक्ष / २०१५ दिनांक : २७ ऑक्टोबर, २०१५

## अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इमाव, व विमाप्र या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता सन २०१५-१६ साठी भारत सरकारची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना — कार्यप्रणाली

(अ.जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजनेसंबंधी माहिती नंतर कळविण्यात येईल.)

भारत सरकार आणि महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना **भारत सरकारची मॅट्रिकोत्तर (Post Matric)** शिष्यवृत्ती दिली जाते. सदरची शिष्यवृत्ती / शिक्षण फी व परीक्षा फी राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग या अधिपत्याखालील समाजकल्याण विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याऱ्या पात्र विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येते.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये दूरस्थ पद्धतीने विविध शिक्षणक्रमांना प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना **भारत सरकारची मॅट्रिकोत्तर (Post Matric)** शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे. सदर शिष्यवृत्ती / शिक्षण फी व परीक्षा फी मिळण्याकरीता **२०१५-१६** या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त विविध अभ्यासकेंद्रावर प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी समाजकल्याण विभागाच्या http://mahaeschol.maharashtra.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे अनिवार्य आहे. याकरीता खालीलप्रमाणे दिलेल्या सूचनांचे काळजीपूर्वक पाल करावे.

### विद्यापीठाची मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रे आणि विद्यार्थी यांचेकरीता शिष्यवृत्ती संबधी सूचना

### १. शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पात्र शिक्षणक्रमांची यादी समाजकल्याण विभागाच्या वेबसाईटवरील होम पेजवरील **महाविद्यालय अभ्यासक्रम यादी या ठिकाणी उपलब्ध आहे.** याकरीता महाविद्यालय अभ्यासक्रम यादी वर क्लिक करून नाशिक जिल्हा निवडावा त्यानंतर पृष्ठ क्रमांक २३२, २३३ व २३४ वरील सदरची यादी पहावी.

### २. पात्रता व अटी

२.१ विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

२.२ अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इमाव व विमाप्र या मागास प्रवर्गातील असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेला जातीचा दाखला जोडवा.

२.३ विद्यार्थ्यांनी एस.एस.सी. (दहावी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२.४ शिष्यवृत्तीकरीता अर्जदाराच्या पालकाचे एकत्रित वार्षिक उत्पन्नाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडावे. उत्पन्नाची मर्यादा – अनुसूचित जातीसाठी रू.२ लाखांपर्यंत, विजाभज, इमाव व विमाप्र करीता रू. १ लाखापर्यंत असावे.

२.५ संबंधित विद्यार्थ्यांने अभ्यासक्रमासाठी मूळ टीसीद्वारे (शाळा सोडल्याचा दाखला) प्रवेश घेतलेला असावा.

२.६ विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमासाठी ७५% पेक्षा जास्त उपस्थिती असावी.

२.७ ज्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत शिक्षणामध्ये खंड आहे त्यांनी गॅप प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

२.८ शिष्यवृत्तीसाठी राष्ट्रीयकृत बँकेत (शक्यतो सेंट्रल बँक ऑफ इंडिया) खाते असणे आवश्यक आहे.

२.९ नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा व त्यास मागील परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२.१० अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी नसावा.

## ३. अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

३.१ अर्जदाराचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र ( फोटो) स्वाक्षरीसह असणे आवश्यक आहे.

३.२ दहावी / बारावी उत्तीर्ण प्रमाणपत्र व गुणपत्रिका / मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका

३.३ जातीचा दाखला / जाती प्रमाणपत्र पडताळणी दाखला. ( Caste Validity Certificate)

३.४ सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा मूळ दाखला.

३.५ आधार कार्ड

३.६ ज्या राष्ट्रीयकृत बँकेत उघडले आहे तो बँक खाते क्रमांक, बँकेचा IFSC Code, MICR Code इ.

३.७ बँक खाते क्रमांक आधार कार्डाशी संलग्न केलेला असावा.

## ४. विद्यार्थ्यांनी अवलंबावयाची प्रक्रीया

४.१ अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इमाव व विमाप्र या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी समाजकल्याण विभागाच्या http://mahaeschol.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन **नविन नोंदणी** या लिंकवर क्लिक केल्यानंतर जी विंडो ओपन होईल त्या विंडोवर **उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी** या पर्यायावर क्लिक करावे. त्यानंतर जो ऑनलाईल अर्ज संगणकावर दिसेल त्या अर्जामध्ये माहिती भरावी.

४.२ अर्जदाराने अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर तो बरोबर असल्याची खात्री करून सबमिट करावा. तसेच पोर्टलवर दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावे. त्याची प्रिंट घेऊन त्याची एक प्रत अभ्यासकेंद्र प्रमुख यांचेकडे आवश्यक त्या कागपत्रांसह सादर करावी व एक प्रत स्वत:कडे ठेवावी.

**४.३ शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत राहील.**

## ५. अभ्यासकेंद्रांनी अवलंबावयाची प्रक्रीया

५.१ विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीसाठी सादर केलेला अर्ज अभ्यासकेंद्र प्रमुखांनी आपल्याकडे जमा करून घ्यावेत व अर्जातील माहिती व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यांची पडताळणी करावी.

५.२ विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमांस प्रवेश घेतलेला आहे त्या अभ्यासक्रमांस शिष्यवृत्ती योजना लागू आहे का? तसेच शुल्काची रक्कम बरोबर आहे का ? याची खात्री करावी.

५.३ शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे अर्जांची दोन प्रतीत जातीच्या प्रवर्गानिहाय यादी तयार करावी. त्याची मूळ प्रत व त्यासोबत विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज मूळ शाळा सोडल्याचा दाखला व मूळ उत्पन्नाचा दाखला) व वरील इतर कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह विद्यापीठाचे नाशिक येथील मुख्यालयातील उपकुलसचिव, आरक्षण कक्ष **दिनांक २१ डिसेंबर, २०१५** यांचेकडे सादर करावेत.

५.४ अभ्यासकेंद्राने शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे काळजापूर्वक तपासले आहेत असे प्रमाणपत्र सादर करावे.

५.५ भविष्यात काही त्रूटी निघाल्यास किंवा माहिती चुकीची आढळल्यास शिष्यवृत्तीची रक्कम वसूलीस केंद्रप्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल व त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**सन २०१४-१५ या मागील शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्तीचे काही अर्ज प्रलंबित असल्यास असे अर्ज वरील प्रक्रियेप्रमाणे पूर्तता करून उपकुलसचिव, आरक्षण कक्ष, विद्यापीठ मुख्यालय, नाशिक यांचेकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत प्रत्यक्ष येऊन सादर करावेत.**

**आरक्षण कक्ष**
**य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक**